सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी वंदना पाटील

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१४ एप्रिल | भाजप महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पदी जरंडी ता. सोयगाव येथील वंदना राजेंद्र पाटील यांची निवड झाल्याची घोषणा जिल्हाध्यक्ष ऐश्वर्या गाडेकर यांनी सोमवारी (दि.१३) नियुक्ती पत्र देऊन केली आहे दरम्यान वंदनाताई पाटील यांनी पक्ष संघटन मजबूत करून पक्षाचे ध्येय धोरणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात पोहचावे असे या नियुक्ती पत्रात नमूद केले आहे या निवडी बद्दल जिल्हा परिषद सदस्य पुष्पाताई काळे, सभापती उत्तम चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य माहीन मुलतानी,पंचायत समिती सदस्य राहुल राठोड,जिल्हा चिटणीस सुनील गव्हांडे,तेजस्विनी ताई काळे,स्वाती पाटील,दिलीप पाटील,कृषिभूषण रविंद्र पाटील आदींनी अभिनंदन केले आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विभागीय माहिती कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्रभारी माहिती उपसंचालक प्रशांत दैठणकर यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. विभागीय माहिती कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास सहायक संचालक (माहिती) गणेश फुंदे, प्रदर्शन सहायक राजेंद्र वाणी, वरिष्ठ लिपिक प्रकाश राऊत, यशोदा ताठे, आदींसह विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. त्यांनीही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

गंगा माई की बेटियाँ या मालिकेत सध्या अतिशय भावनिक वळण

छत्रपती संभाजीनगर | झी टीव्हीवरील गंगा माई की बेटियाँ या मालिकेत सध्या अतिशय भावनिक वळण पाहायला मिळत आहे. दुर्गावतीच्या दबावामुळे गंगा माई स्नेहाला सिद्धूपासून दूर होण्यास सांगते, ज्यामुळे स्नेहा पूर्णपणे कोलमडून गेली आहे. या ट्रॅकबद्दल बोलताना अभिनेत्री अमनदीप सिधू म्हणाली की, हे दृश्य चित्रित करणे तिच्यासाठी भावनिकदृष्ट्या खूप कठीण आणि वैयक्तिक अनुभवासारखे होते. स्नेहाने नुकतेच प्रेम स्वीकारले असताना तिला नात्याचा त्याग करण्यास सांगणे खूप वेदनादायी आहे. आता सिद्धू आणि स्नेहा कुटुंबाच्या दबावापुढे झुकणार की एकत्र उभे राहणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. पहा 'गंगा माई की बेटियाँ' या मालिकेतील हे सगळे नाट्य दररोज रात्री 9 वाजता फक्त झी टीव्हीवर!

देशव्यापी मोहिमेद्वारे एलपीजी गॅसचा पुरवठा आता सुरक्षित

छत्रपती संभाजीनगर - एलपीजीचा साठा करणे आणि त्यासंदर्भातील काळाबाजार कायमस्वरुपी बंद व्हावा या हेतून शासनाने अंमलबजावणी यंत्रणा अधिक बळकट केली आहे. देशातील प्रत्येक ग्राहकाला स्वयंपाकाच्या इंधनाचा सुरळीत पुरवठा करण्यासाठी शासन कठीबद्ध आहे. सुनियोजित काम आणि सुरळीत पुरवठा याकडे शासनाचा अधिक भर आहे. सुनियोजित आणि शिस्तबध्द कामाचा भाग म्हणून, केवळ ११ एप्रिल २०२६ रोजी २,७०० हून अधिक तपासण्या आणि छापे टाकण्यात आले. काळाबाजार, घरगुती एलपीजीचा गैरवापर रोखणे आणि वितरण पद्धतीमध्ये पारदर्शकता वाढवणे हा या कारवाई मागील महत्त्वाचा उद्देश आहे.

ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत भारतीय लष्कराने सिक्कीममधील पर्यटकांची सुटका केली

पुणे : भारतीय लष्कराने, बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशन (बीआरओ) आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने, ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत उत्तर सिक्कीममध्ये अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढले.

तारामचूच्या पुढे भूस्खलनामुळे रस्त्याचा एक महत्त्वाचा भाग कोसळल्याने, चट्टनकडे जाणारा मार्ग बंद झाला आणि शेकडो पर्यटक अडकून पडले. त्यानंतर हे ऑपरेशन सुरू करण्यात आले. भारतीय लष्कराचे अभियंते—त्रिशक्ती सॅपर्स—तात्काळ कामाला लागले आणि त्यांनी रस्त्याची दुरुस्ती सुरू केली. या ऑपरेशनमधील एक महत्त्वाचे यश म्हणजे तुटलेल्या रस्त्यावर एका तात्पुरत्या पादचारी पुलाचे वेगाने बांधकाम करणे, ज्यामुळे कठीण हवामान आणि भूभाग असूनही लोकांना सुरक्षितपणे बाहेर पडणे शक्य झाले. याव्यतिरिक्त, पथकांनी डोंक्याला पास येथील दाट बर्फ देखील हटवला, ज्यामुळे मार्ग खुला राहिला आणि बचावकार्य सुरू राहिले.

द कंझ्युमर-ब्रँड डायनॅमिक' अहवालात जेन अल्फा ग्राहक प्रवृत्तीवर प्रकाश टाकला

पुणे - जेन अल्फा ही डिजिटलदृष्ट्या खोलवर जोडलेली पिढी आहे, जी भारताच्या लोकसंख्येच्या चतुर्थांशाहून अधिक भागाचे प्रतिनिधित्व करते. या पिढीतील 73% मुलांकडे आधीच वैयक्तिक स्मार्टफोनची उपलब्धता आहे आणि 60% मुले लॅपटॉपचा वापर करतात. ही अशी पिढी आहे ज्यांनी तंत्रज्ञानामध्ये स्वातंत्र्याचा अनुभव घेतला आहे. जेनरेशन अल्फाला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, रुकम कॅपिटलने 'जेन अल्फा डिकोडेड: द कंझ्युमर-ब्रँड डायनॅमिक' हा अनोखा अहवाल सादर केला आहे, जो ते ग्राहक वर्तन आणि ब्रँड एंगेजमेंट कसे नव्याने परिभाषित करत आहेत हे स्पष्ट करतो.

डॉ. देव यांनी डॉक्टर पदाचा त्याग केला

सोनी सबची नुकतीच सुरू झालेली मालिका यादें प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे डॉ. देव मेहता (इकबाल खान) यांच्या भावनिक प्रवासातून प्रायश्चित्त, जिद्द आणि स्वतःला पुन्हा शोधण्याच्या कहाणीमधून. एकेकाळी प्रसिद्ध असलेला डॉक्टर, आठ वर्षांची स्मृती हरवल्यानंतर आता स्वतःची ओळख आणि उद्दिष्ट पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. या प्रवासात त्याला तुटलेल्या नात्यांचा वेदनादायक सत्य, मुलाचा मृत्यू आणि स्वतःचा हरवलेला चेहरा सामोरा येतो जो त्यालाही ओळखता येत नाही.

यादें मधील सृष्टी ही तिच्या शांततेतून आणि भावनांमधून स्वतःला व्यक्त करते

सोनी सब ची नुकतीच सुरू झालेली मालिका यादें ही आयुष्य, हरवलेले क्षण आणि दुसऱ्या संधींच्या गुंतागुंतीला भावनिक कथनातून उलगडते. या प्रवासाला अधिक खोली देणारी अभिनेत्री गुलकी जोशी, जी सृष्टी अग्रवालची भूमिका साकारते एक शांत पण भावनिक हॉस्पिटल प्रशासक, जी प्रेम, जिद्द आणि न बोललेल्या भावनांमधून आयुष्य जगते. तिच्यासोबत डॉ. देवची भूमिका साकारणारा इक्बाल खान आहे, जो सृष्टीचा माजी पती आहे. ही मालिका मानवी नात्यांवर आधारित सूक्ष्म कथन आणि हृदयस्पर्शी गोष्टी प्रेक्षकांसमोर आणते.

तोरल रासपुत्र आणणार कुंतीचे सामर्थ्य

सोनी सब आपल्या कथाकथनाच्या कॅनव्हासला अधिक विस्तार देत आहे आणि घेऊन येत आहे हस्तिनापुर के वीर एक पौराणिक मालिका जी पांडवांच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या काळावर आणि त्यांच्या दंतकथांच्या घडणीवर प्रकाश टाकते. या कथेला भावनिक गाभा देण्यासाठी आणि तीव्रता वाढवण्यासाठी, लोकप्रिय अभिनेत्री तोरल रासपुत्र निभावणार आहे कुंतीची भूमिका – एक आई जी आपल्या सामर्थ्याने, त्यागाने आणि शांत संघर्षांनी आपल्या मुलांच्या नियतीला आकार देते.

भारतीय संविधानाचा केंद्रबिंदू हा सामान्य माणूस : साहित्यिक उत्तम कांबळे

एमजीएममध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ : भारतीय संविधान हा केवळ कायद्यांचा समूह नसून तो या देशातील लोकांचे मुक्तीगान आहे. माणसाच्या मुक्तीची प्रेरणा संविधानात अंतर्भूत आहे. पूर्वी लोक जात, प्रदेश, धर्म आणि देव यांची ओळख सांगत असत आणि त्या चौकटीत माणूस दडपला जात होता. भारतीय संविधानाने माणसाला साद घालत त्याला या बंधनांतून मुक्त केले. भारतीय संविधानाचा केंद्रबिंदू हा सामान्य माणूस असून संविधानाने हा देश लोकांच्या मालकीचा केला, असे प्रतिपादन साहित्यिक उत्तम कांबळे यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीने आईनस्टाईन सभागृहात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ पत्रकार तथा साहित्यिक उत्तम कांबळे यांचे 'भारतीय संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे द्रष्टे नेतृत्व' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी साहित्यिक उत्तम कांबळे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, ज्येष्ठ गांधीवादी श्रीराम जाधव, अंकुश भालेकर, ज्येष्ठ संपादक प्रविण बर्दापुरकर, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, सर्व अधिष्ठाता, संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना साहित्यिक उत्तम कांबळे म्हणाले, संविधान जन्माच्या आधी भारतात आम्ही नावाचे कोणीच नव्हते, सगळे मी होते. आणि हे मी जातीत, पंथात, प्रदेशात, भाषांमध्ये आणि जीवनशैलीत विभागलेले होते. आम्ही शब्दाने राष्ट्राचे स्वप्न पाहिले आणि या आम्ही शब्दातून आपल्या भारत राष्ट्राची निर्मिती झाली. संविधान जन्माच्या आधी येथे संस्थानिक होते आणि माणसांची ओळख तशीच होती संविधान आपल्या हातात आले आणि येथील सगळे तुकडे संपले आणि येथे भारतीय जन्माला आले. माणूस ते लोक हा एक मोठा राजकीय आणि सामाजिक प्रवास आहे. संविधानामुळे देशातील कोट्यावधी लोक देशाचे मालक झाले.

भारतीय संविधान हा केवळ कायद्यांचा समूह नाही तर ते नव्या भारताचा पाया आहे. जो नवा भारत जातमुक्त असेल, जो धर्ममुक्त असेल, जो अंधश्रद्धामुक्त असेल, जो घराणेशाही मुक्त असेल, जो दारिद्र्यमुक्त असेल, जो अपमानमुक्त असेल अशा भारताचे स्वप्न बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या डोक्यामध्ये होते, असे साहित्यिक उत्तम कांबळे यांनी सांगितले.

साहित्यिक उत्तम कांबळे पुढे बोलताना म्हणाले की, गेल्या चाळीस वर्षामध्ये बाबासाहेबांचे ज्या वेगाने प्रतिकांत रूपांतर होत आहे, तो सगळ्यात मोठा धोका आहे. कोणत्याही पुतळ्यातील महापुरुष समाज परिवर्तन घडवू शकत नाही. समाज परिवर्तन घडवायचे असेल तर पुतळ्यातील महापुरुष रस्त्यावर काढावा लागतो, रणांगणावर काढावा लागतो आणि त्याच्या हातात हात घालून त्याच्या विचारांची आयुधे घेऊन लढाव लागतं, तर परिवर्तन होते.

एमजीएम विद्यापीठ हे ज्ञानाच्या निर्मितीचे काम करीत असून विद्यापीठात आपण संविधान हा विषय सर्व विद्यार्थ्यांना शिकवत असतो. आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन करीत असताना विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनाचा मार्ग सुखकर करणे आवश्यक असल्याचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ.आशा देशपांडे यांनी केले.

डॉ. अनिरुद्ध नाईक यांच्या कथा मातीचे अंतरंग फुलविणाऱ्या : डॉ. वासुदेव मुलाटे यांचे प्रतिपादन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी | रविवार रोजी आर्किटेक्ट डॉ. अनिरुद्ध नाईक यांच्या 'लिंबावरचे पूर्वज' आणि 'करोल मावशी व इतर कथा' या दोन कथासंग्रहांचा प्रकाशन सोहळा रविवारी, १२ रोजी थाटात पार पडला. ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. वासुदेव मुलाटे यांनी साहित्य परंपरा समजावून सांगताना डॉ. नाईक यांची कथा आपल्या भोवतालचा परिसर, आपलं गाव, कृषी संस्कृती यातून कशी फुलत जाते, अशी अभ्यासपूर्व मांडणी केली. उंडणगाव येथील डॉ. अनिरुद्ध नाईक यांच्या दोन कथासंग्रहांचे प्रकाशन डॉ. वासुदेव मुलाटे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी महापौर समीर राजुरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अनिरुद्ध नाईक यांच्या लेखनातून पर्यावरण आणि कृषिसंस्कृतीचे दर्शन घडते, असे समीर राजूरकर यांनी म्हणाले. 'लिंबावरचे पूर्वज' या कथेचा संदर्भ देऊन वृक्ष संगोपन करण्याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. या पुस्तकांवर प्रा. डॉ. शिवाजी हुसे आणि सरदार जाधव यांनी सविस्तर भाष्य नोंदवले. बदलते ग्रामीण जीवन व कृषी समाजाच्या समस्या मांडण्याचे महान कार्य अनिरुद्ध नाईक यांची कथा करते, असे प्रा. हुसे म्हणाले. अनिरुद्ध नाईक यांच्या लेखनातील भाषा अजिंठा डोंगरातील बोली भाषेचे प्रतिनिधित्व करते आणि व्यक्तीचित्रण, निसर्ग व प्रसंग वास्तवता, चित्रमयता वाढवते असे सरदार जाधव म्हणाले.

ॲड. मिलिंद महाजन यांनी सूत्रसंचालन केले. सविता लांडगे यांनी प्रास्ताविक केले आणि 'गणेशवाडी प्रकाशना' तर्फे माधुरी नाईक यांनी प्रकाशक म्हणून आपली भूमिका मांडली. अनिरुद्ध नाईक यांनी मनोगतातून लेखनामागील प्रेरणा आणि लेखनप्रक्रिया याविषयी सांगितले. उंडणगाव या ग्रामीण भागातून गेल्या अनेक वर्षांपासून साहित्य, कला, संस्कृती वाढीस लागावी म्हणून सातत्याने चांगले कार्यक्रम आयोजित केले जातात त्यातूनच आपल्यातील लेखकाचा जन्म झाला, असे नाईक म्हणाले. विजय नाईक यांनी आभार प्रदर्शन केले.

याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार सुधीर महाजन, डॉ. राजेंद्र धनवई, सखाराम पानझडे, सर्जेराव वाघ, उत्तम बावस्कर, सुहास जोशी, दगडू लांडगे, संजय भागवत, विलास फुटाणे ,संभाजी मुळे, प्रवीण सोनवणे. सुनील महाजन, रंजन कंधारकर, संगीता धारूरकर ,सुनिता कपाळे, अशोक शेवगण, विजय पांचाळ , संजय खोंडे, प्रशांत नारखेडे, भगवान गायकवाड आदी उपस्थित होते.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास अप्पर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अपर आयुक्त महसूल रीता मेत्रेवार, अपर आयुक्त आस्थापना दादासाहेब वानखेडे सह आयुक्त रोहयो डॉ. अनंत गव्हाणे, तहसिलदार किशन भदाने आदींसह विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. त्यांनीही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

हिरडपुरी विहामांडवा मार्गे चोरटी वाळू वाहतूक

पैठण दि १३ :- जालना तसेच बीड जिल्हा गोदावरी घनथडी भागातून वाळू टेंडर च्या नावाखाली हिरडपुरी विहामांडवा पाचोड मार्गे छत्रपती संभाजीनगर अशी चोरटी अवैध वाळू वाहतूक सुरू असून महसूल तथा पोलीस प्रशासनाने या अवैध वाळू वाहतुकीला लगाम घालावे अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे महत्त्वाचे म्हणजे रविवारी रात्री विहामांडवा जवळ वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकने एका व्यक्तीला उडवल्याने त्या व्यक्तीला पैठणच्या एका खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. शेवटी वाळू तस्करांनी तडजोडी अंती हे प्रकरण मिटवल्याची चर्चा आहे. पैठण तालुका गोदावरी हद्द शेजारील बीड तसेच जालना जिल्ह्यातील आपेगाव, बळेगाव , साष्ट पिंपळगाव,सुरळेगाव आदी गावात वाळू टेंडर सुरू असून या टेंडरची वाळू बगैर रॉयल्टीच्या हिरडपुरी मार्गे विना क्रमांक ओव्हरलोड विहामांडवा, पाचोड, व्हाया संभाजीनगरला पोहोचत आहे. यात काही हिष्ट्रीशीटर लक्ष देत असल्याने. या अवैध प्रकाराने रहदारीला मोठा त्रास होत असून काही शेतकऱ्यांनी याबाबत पैठण तहसीलदार, पोलीस प्रशासन,जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. तालुक्यातील टाकळी अंबड आवडे उंचेगाव येथून ही वाळू तस्कर रात्रंदिवस अवैध वाळू तस्करी करत आहेत. या प्रकारावर महसूल तसेच पोलीस प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

संविधानातील अधिकार आणि कर्तव्याच्या पालनाबरोबरच मूल्यांचा अंगीकार करावा- जिल्हाधिकारी विनय गौडा जी .सी

महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ (जिमाका)- भारतीय संविधानाने हक्काबरोबरच कर्तव्य दिली असून एक सुजाण नागरिक म्हणून संविधानाच्या 'उद्देशिकेमध्ये' मुख्य मूल्यांचा उल्लेख आहे यातील,न्याय,स्वातंत्र्य ,समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता या मूल्याचा अंगीकार करून त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, उपनिवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड , निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके, भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, रोहयो उपजिल्हाधिकारी रुपेश शिंगारे ,जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन, चरित्र आणि त्यांनी केलेल्या कार्याविषयीची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी सांगितली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अमूल्य योगदान असून त्यांनी समानतेचा अधिकार संविधानाच्या माध्यमातून दिला. एकात्मता, बंधुभाव या मूलभूत तत्वाच्या अंगीकार व्यक्तीने संविधानाच्या माध्यमातून करण्याबाबत मार्गदर्शन केले. जगातील सर्वात मोठी लोकशाही आपल्या देशाची असून यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अमूल्य योगदान असल्याचे विधाते यांनी सांगितले.

स्वामी भागवत नंदगिरी जी महाराज श्री 1008 यांच्या पुण्यतिथीनिमित्त वेरूळ येथे शिव महापुराण कथा महोत्सव



तभा वृत्तसेवा

खुलताबाद दि १४ एप्रिल .श्री क्षेत्र वेरूळ येथे स्वामी भागवत नंदगिरी जी महाराज श्री १००८ महामंडलेश्वर यांच्या पुण्यतिथीनिमित्त. उत्तराधिकारी अभय नंद गिरीजी महाराज मठपती कैलास आश्रम वेरूळ यांच्या मार्गदर्शनाखाली. दि १० एप्रिल ते १७ एप्रिल पर्यंत. परमपूज्य गोवछल्य.. गोवछल्य. श्री राधाकृष्ण स्वामी जी जोधपुर राजस्थान यांच्या मुखातून होत असून या कथेसाठी राज्यभरातून हजारो भाविकांची उपस्थिती संपन्न होत आहे जगद्गुरु जनार्दन स्वामी यांचे उत्तर अधिकारी स्वामी१००८ महामंडलेश्वर शांतिगिरी जी महाराज श्री क्षेत्र वेरूळ यांच्या भव्य दिव्य डोम मध्ये ही कथा होत आहे.

यासाठी अन्नदान मोठ्या प्रमाणात होत असून येणाऱ्या भाविकांसाठी सर्व सुख सुविधा साठी भक्ता मंडळाकडून व्यवस्था करण्यात येत आहे श्री स्वामी राधाकृष्णजी महाराज यांनी सोमवारी रोजी कैलास लेणी घृष्णेश्वर मंदिर या ठिकाणी भेटी देऊन समाधान व्यक्त केले कैलास शिल्प हे साक्षात महादेव या ठिकाणी स्वयंभू असल्यासार के मनाला वाटले कथे दरम्यान भक्तांनी आपले आचार विचार शुद्ध ठेवून भक्ती करा शेतकऱ्यांनी गावरान गाईचे पालन करून शेतीचे उत्पन्न वाढवा गो सेवा करा असे म्हटले या कथेसाठी. आ प्रशांत बंब यांच्यावतीने भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे यांनी महाराजांचे स्वागत केले . आलेल्या सर्व.मान्यवरांचे कैलास आश्रमाच मठपती स्वामी अभयानंद गिरीजी महाराज यांनी सर्वांचे आभार मानले. हरिभक्त पारायण गोकुळ महाराज वाकळे भडजीकर यांनी या कथेसाठी भाविक भक्तांनी मदत करा असे आवाहन केले

एमजीएममध्ये बुधवारी होणार एआययू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सायकलिंग स्पर्धेचे उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर | असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चार दिवसीय अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोड सायकलिंग स्पर्धेला बुधवार, दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी सुरूवात होणार असून देशभरातील सुमारे ३५० सायकलपटू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचा शुभारंभ बुधवार, दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ६ वाजता झाल्टा फाटा, धुळे-सोलापूर महामार्ग येथे मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून होणार आहे. तसेच स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन दुपारी ४ वाजता रुक्मिणी सभागृहात पार पडणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सहात साजरी

पैठण दि १४ :- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्य बसस्थानक परिसरातील महामानव स्मारक येथे त्यांच्या पूर्णकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.यावेळी आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी समाज बांधवांना जयंती उत्सवाची शुभेच्छा देत यंदा लोकप्रिय कार्यक्रम घेतल्या बद्दल जयंती उत्सव समितीची प्रशंसा केली. सकाळी पॉवर ते स्मारक अशी भव्य अभिवादन रॅली काढण्यात आली ज्यात हजारो समाज बांधवांनी सहभाग घेतला. याप्रसंगी आमदार विलास बाप्पू भुमरे,दत्ता गोर्डे,नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसणकर, उप नगराध्यक्ष तुषार पाटील, शिवाजी नागरी बँकेचे चेअरमन रवींद्र काळे, सुरज लोळगे,पोलीस निरीक्षक महादेव गोमारे,माजी नगराध्यक्ष राजू गायकवाड, जितसिंग करकोटक, उत्सव समितीचे अध्यक्ष किरण घाटविसावे, नगरसेवक मनीषा साळवे,जालिंदर अडसूल, शेखर शिंदे, सुनील रासणे,गोवर्धन टाक,शिवराज परिक, लालू वीर,बजरंग लिंबोरे, कृष्णा मापारी,वरकड स्वप्नील साळवे,सुमित मगरे, खुशालराव भवरे,अरुण काळे,महेंद्र साळवे, अमोल जाधव,संदीप मडके, अनिकेत धारकर,पत्रकार रमेश लिंबोरे,गौतम बनकर, मदन अव्हाड, मंगलसिंग भवरे,राहुल पगारे,महेंद्र राजगुरु,संभाजी पगारे, महादेव बटूळे, शहराध्यक्ष सोमनाथ निकाळजे, गणेश पवार,बबलू बागवान,विनोद मगरे आदींसह हजारो समाज बांधव उपस्थित होते.सायंकाळी शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापूर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

सिव्हिल एम.ए.क्र.२३९/२०२६

जिजाबाई भाऊसाहेब बनसोडे व इतर

विरूध्द

निरंक

प्रकरण:- वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी, हिरालाल गिरजाबा गायकवाड यांचा दि.१७/०५/२०२१ रोजी गिताबन, कोव्हीड हॉस्पीटल, अनंतपुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला असुन व कौशल्याबाई हिरालाल गायकवाड यांचा दि.२७/१०/२००५ रोजी डोमेगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत हिरालाल गिरजाबा गायकवाड आणि मयत कौशल्याबाई हिरालाल गायकवाड हे आपसात पती पत्नी होते. मयत हिरालाल गिरजाबा गायकवाड यांची आई नामे शाहुबाई गिरजाबा गायकवाड आणि वडील नामे गिरजाबा गायकवाड यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार नं. १) जिजाबाई भाऊसाहेब बनसोडे, रा. शहाजतपुर, ता. वैजापुर जि. औरंगाबाद २) विजय हिरालाल गायकवाड, रा.डोमेगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) रंजना सखाहारी चाबुकस्वार, रा. बोरसर, ता. वैजापुर जि. औरंगाबाद ४) मंदा प्रकाश किर्तीकर, रा. फुलशिवरा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री. बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, अर्जदार नं. १ ते ४ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि. १३/०४/२०२६.

आदेशावरून
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

जा.क्र./जे-३/1692/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर,
दि. 08 APR 2026

चौकशीची जाहीर नोटीस

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

चौकशी अर्ज क्रमांक जे-३/५१/२०२६ कलम :- १९

न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: PARWATI FOUNDATION, CHHATRAPATI SAMBHAJI-NAGAR, At.Post. Gut No.४५६ Plot No.१८ Tq. Dist. Chhatrapati Sambhajinagar...

अर्जदार :- Dhanraj Buwaji Hajare

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, सहाय्यक धर्मादाय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मालमत्ता (वर्णन) - १४,०००/-

ब) स्थावर मिळकत (वर्णन) काही नाही.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी दिली असे.

न्यायशाखा (अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय छत्रपती संभाजीनगर

जाहिर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११४३/२०२५ नि.नं.

सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

अर्जदार : १) श्रीमती कुसूम सुरेश गायकवाड वय ६५ वर्षे, धंदा घरकाम २) श्री गोविंद सुरेश गायकवाड वय- ५० वर्षे, धंदा मजूरी ३) श्री युवराज सुरेश गायकवाड वय- ४७ वर्षे, धंदा मजूरी सर्व रा. घर नं. १०१९, लिमयेवाडी, इंदिरानगर, सोलापूर

विरूध्द

सामनेवाला : कोणी नाही

ज्याअर्थी अर्जदार यांनी सुरेश भिमराव गायकवाड यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवून मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सदर के सुरेश भिमराव गायकवाड यांचे दिनांक १४.०२.२०२२ रोजी निधन झाले आहे. अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी असून, अर्जदार क्र.२ व ३ मुले आहेत. सदर अर्जदार हे के सुरेश भिमराव गायकवाड यांचे वारस असल्याबाबत कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा मे. न्यायालयाने नमलेली तारीख दिनांक 17/5/२०२६ रोजी स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून, म्हणणे द्यावे. अन्यथा मे. न्यायालय पुढील योग्य ते आदेश पारीत करेल याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले तारीखः २५.०३.२०२६

शिक्का

कनिष्ठ लिपिक सहा. अधिक्षक

दि. न्या. सोलापूर